# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार )

जा.क्र. ३९५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०८/०७/२०१६.

**१) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :–**

दिनांक ०७/०७/०१६ रोजी १६.०० वा. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३४ एएक्स ९७९४ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत राज्य मार्ग क्र. २७१ पवनी येथे भरधाव वेगाने व धोकादायकरित्या चालवितांना मिळुन आला. त्याचे डॉक्टर परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डहाके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०७/०७/२०१६ रोजी १६.०० ते १६.१५ वा. दरम्यान आरोपी काळी पिवळी गाडी क्र. एमएच ३१/८०५९ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन तावसी टी पॉईंट दिघोरी येथे आमरोडवर उभे करून येणा–या जाणा–या वाहतुकीस अळथडा करीत असतांना मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादि सपोनि. यादव पो.स्टे. दिघोरी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. यादव पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**३) वैनगंगा नदिच्या पात्रात बुडाल्याने दोघांचा मृत्यु. :–**

दिनांक ०६/०७/२०१६ रोजी १८.०० वा. १) मोहम्मद जाहीद अली लखानी वय १४ वर्ष २) सोहेल रज्जाक अली बदामी वय ३५ वर्ष दोन्ही रा. जानी वार्ड ब्रम्हपुरी हे आपल्या जातीय मुस्लीम बांधवासह अंदाजे ४० लोक ईद उत्सव संपवुन सहलीकरीता जिप गाडीने गोसे धरण पाहण्यास आले होते. सर्व लोक आपआपल्या परीने गोसे धरण पाहात असतांना मोहम्मद जाहीद अली लखानी याचा पाय घसरून तोल गेल्याने तो नदी पात्रात बुडत असतांना त्याला वाचवीण्यास सोहेल रज्जाक अली बदामी यांनी नदीच्या खोल पाण्यात उडी घेतली परंतु दोघेही गोसे धरण वैनगंगा नदिच्या खोल पाण्याच्या प्रवाहात बुडुन मरण पावले. असे फिर्यादी इकबालभाई गुलाम अब्बास जेसानी वय ५७ वर्ष, रा. पटेल नगर ब्रम्हपुरी जि. चंद्रपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ०७/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०२ केसस, तिन सिटर वाहनांवरती १४ केसेस व इतर वाहनांवरती ५३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.